सत्यमेव जयते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र./बार्टी/पुणे/योजना/२०२५-२६/१७२३ दिनांक:-१२/०३/२०२६

# संघ लोकसेवा आयोग –नागरी सेवा, महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा-, अभियांत्रिकी सेवा, अराजपत्रित गट "ब "व "क", कर्मचारी निवड आयोग वर्ग ३ स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरीता प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्याच्या कागदपत्रे तपासणी बाबत महत्वाची सूचना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे मार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग- राज्यसेवा अभियांत्रिकी सेवा, न्यायिक सेवा, अराजपत्रित गट "ब"व "क", कर्मचारी निवड आयोग वर्ग ३ परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी दिनांक १५/१२/२०२५ रोजी तात्पुरती निवड व प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आलेली होती. तसेच उमेदवारांना पसंतीची प्रशिक्षण संस्था निवडीकरीता ऑनलाईन पोर्टल च्या माध्यमातून विकल्प उपलब्ध करून देण्यात आले होते.

संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा, महाराष्ट्र लोकसेवा आयोग- राज्यसेवा , अभियांत्रिकी सेवा, अराजपत्रित गट "ब"व "क", कर्मचारी निवड आयोग वर्ग ३ परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या तसेच कागदपत्रे तपासणी झालेल्या पात्र विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण **दिनांक २३ फेब्रुवारी २०२६** पासून सुरु करण्यात आलेले आहेत.

ऑनलाईन पोर्टल च्या माध्यमातून प्रशिक्षण व प्रशिक्षण संस्था निवडलेल्या प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण निहाय रिक्त जागांवर पसंती दिलेल्या प्रशिक्षण संस्थेबाबत ईमेल व Confirmation Slip दिनांक १०/०३/२०२६ रोजी पाठविण्यात आलेल्या आहेत अशा विद्यार्थ्यांची **दिनांक १२/०३/२०२६, १३/०३/२०२६, १६/०३/२०२६, १७/०३/२०२६ व दिनांक १८/०३/२०२६ पर्यं**त कागदपत्राची तपासणी करण्यात येत आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्वंकष धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार मा. अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या दिनांक ११/०९/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार काठिण्य पातळीनुसार चढत्या क्रमाने (वर्ग४<वर्ग३<वर्ग २<वर्ग १) घेण्यात येणाऱ्या पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांने पुर्वी तुलनेने कमी काठिण्य पातळी पुर्व प्रशिक्षणाचा लाभ घेतला असला तरी संबंधित विद्यार्थ्यांस चढत्या क्रमाने प्रशिक्षण कार्यक्रमाचा पुन:श्च केवळ एकदाच लाभ घेता येईल. अशाप्रकारे एक विद्यार्थी/उमेदवार स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रमाचा जास्तीत

जास्त दोनदा लाभ घेण्यास पात्र राहील यानुसार उमेदवारांनी यापूर्वी दोन योजनांचा लाभ घेतला असल्यास अपात्र राहील. दोनपेक्षा जास्त योजनांचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येत असून अशा उमेदवारांना योजनांचा लाभ देण्यात येणार नाही. तसेच यापूर्वी UPSC (वर्ग-१) प्रशिक्षणाचा लाभ घेतला असल्यास अशा विद्यार्थ्यांची UPSC- Civil Services, MPSC-State Service, MES, JMFC, Group "B" and "C", IBPS, SSC-class III करिताची निवड रद्द करण्यात येत आहे याची नोंद घ्यावी.

**कागदपत्रे तपासणी करिता पत्ता: डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) , पुणे. क्वीन्स गार्डन, पुणे, महाराष्ट्र ४११००१**

संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा , महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवा, अभियांत्रिकी सेवा, अराजपत्रित गट "ब"व "क", कर्मचारी निवड आयोग वर्ग ३ परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता प्रतीक्षा यादीतील निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी दिनांक १८/०३/२०२६ पर्यंत मूळ कागदपत्रे तपासणी न केल्यास सदरचा प्रवेश/निवड रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी. याबाबत कोणतेही निवेदन किंवा अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

स्वाक्षरी/-
**महासंचालक**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे.**

**महत्वाचे:**

१. दिनांक १०/०३/२०२६ रोजी ईमेल व Confirmation Slip प्राप्त विद्यार्थ्यांची **दिनांक १२/०३/२०२६, १३/०३/२०२६, १६/०३/२०२६, दिनांक १७/०३/२०२६ व दिनांक १८/०३/२०२६** पर्यंत कागदपत्राची तपासणी करण्यात येणार असून Confirmation Slip प्राप्त न झालेल्या विद्यार्थ्यांची कागदपत्रे तपासणी सदर कालावधी मध्ये करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
२. कागदपत्रे तपासणी करिता विद्यार्थ्यांनी परिशिष्ट अ, ब व क सोबत घेऊन येणे बंधनकारक असेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

# परिशिष्ट अ- कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| १. | ऑनलाईन पोर्टल च्या माध्यमातून प्रशिक्षण व प्रशिक्षण केंद्र/संस्था निवडल्याबाबत Confirmation Slip |
| २. | संबधित प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन पोर्टलवर अपडेट केलेला मूळ विनंती (Application Form) २ पासपोर्टच्या आकाराचे फोटो. |
| ३. | इ. १० वी चे प्रमाणपत्र |
| ४. | इ. १२ वी चे प्रमाणपत्र |
| ५. | पदवी प्रमाणपत्र |
| ६. | पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र (बंधनकारक नाही) |
| ७. | अर्जदाराचे अनुसूचित जातीचे मूळ प्रमाणपत्र |
| ८. | महाराष्ट्राचा रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र (डोमिसाईल प्रमाणपत्र) |
| ९. | अर्जदाराचे आधार कार्ड |
| १०. | अर्जदाराचे पॅन कार्ड |
| ११. | बँक पासबुक किंवा धनादेशाची (Cancelled Cheque) सुस्पष्ट दोन प्रती (आधार लिंक असलेला खाते क्रमांक, IFSC Code, MICR Code या सर्व बाबी स्पष्ट नमूद असणे आवश्यक आहे.) |
| १२. | दिव्यांगत्वाचा दाखला (लागु असल्यास)<br>(शासनाच्या सक्षम प्राधिकारी यांनी वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या नमुन्यातील वैध दिव्यांगत्वाबाबतचे प्रमाणपत्र (Certificate of Disability) असावे.) |
| १३. | अर्जदाराचा अनाथ असल्याचा दाखला, लागु असल्यास (उपायुक्त महिला व बाल विकास आयुक्तालय यांनी निर्गमित केलेला दाखला असावा.) |
| १४. | अर्जदाराचा मागील ३ वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा कमी असलेला उत्पन्नाचा मूळ दाखला (आर्थिक वर्ष: २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५)<br>(तहसिलदार कार्यालयाने निर्गमित केलेला असावा.) |
| १५. | स्वयंघोषणापत्र<br>(अर्जदाराने विहित नमुन्यात (परिशिष्ट ब) देण्यात आलेले स्वयंघोषणापत्र व त्यामधील सर्व माहिती भरलेली असावी. तसेच त्यावरील फोटो हा अद्ययावत असावा.) |
| १६. | प्रवेश अर्ज (परिशिष्ट क प्रमाणे) |

** टीप विद्यार्थ्यांनी वरील तक्त्यात दिलेल्या सर्व कागदपत्रांची मूळ प्रत व प्रत्येकाच्या छायांकित प्रतीचा एक संच सोबत घेऊन यावा.

# परिशिष्ट- ब

# स्वयंघोषणापत्र

मी---------------------------------------------------सत्य प्रतिज्ञेवर सांगतो / सांगते की, मी सन २०२५-२६ या कालावधीत डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था(बार्टी), पुणे मार्फत अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठीच्या----------------------------------------------------- योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक असून मी कोणतेही भौतिक आमिषे उदा. टॅब्लेट, आर्थिक लाभ,प्रशिक्षण कालावधीमध्ये विविध सवलती इत्यादी सवलतीस बळी न पडता स्वइच्छेने माझ्या पसंतीच्या ----------------------------------------------------या खाजगी प्रशिक्षण संस्थेची निवड केली आहे व त्यानुसार मी माझा प्रवेश निश्चित करत आहे.

**प्रशिक्षण योजनेच्या अटी व शर्ती :**

१. सदरची प्रशिक्षण योजना प्रशिक्षण सुरु झाल्यापासून पुढील ११ महिने किंवा ६ महिन्यांकरीता आहे. या प्रशिक्षण योजनेकरीताच्या विद्यावेतनासाठी किमान उपस्थिती ७५% असणे बंधनकारक आहे याची मला जाणीव आहे. या नियमानुसार मी उपरोक्त नमूद प्रशिक्षण संस्थेत माझ्या इच्छेनुसार प्रवेश घेत आहे.

२. सदर प्रशिक्षण कार्यक्रम हा ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येणार असून प्रत्यक्ष वर्गात उपस्थित राहून प्रशिक्षणाचा लाभ घेणे बंधनकारक असल्याची मला जाणीव असून मी प्रत्यक्ष वर्गात उपस्थित राहून प्रशिक्षण घेईन. प्रशिक्षण संस्थेकडे ऑनलाईन प्रशिक्षण देण्याची मागणी केल्याचे आढळून आल्यास माझा प्रवेश रद्द होईल याबाबत मी अवगत आहे.

३. प्रशिक्षण संस्थेकडून प्रशिक्षण काळात दर महिन्याचे बायोमेट्रिक उपस्थिती पत्रक डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था(बार्टी), पुणे संस्थेस प्राप्त झाल्यावर त्याची पडताळणी करून DBT द्वारे माझ्या बँक खात्यावर जमा केली जाईल यास माझी काही हरकत नाही. प्रत्येक महिन्याची उपस्थिती किमान ७५% न भरल्यास त्या महिन्याच्या विद्यावेतनास मी अपात्र ठरेल, याची मला जाणीव आहे.

४. मी कागदपत्र पडताळणी दरम्यान सादर केलेले अनुसूचित जातीचे जात प्रमाणपत्र, इतर सर्व कागदपत्रे व भरून दिलेली माहिती ही खरी आहे. जर काही खोटे आढळल्यास माझा प्रवेश रद्द होऊ शकतो याची मला जाणीव आहे. तसेच दरम्यानच्या काळात घेतलेले सर्व लाभ मी परत करेन व पुढील कायदेशीर कार्यवाहीस मी पात्र राहीन.

५. मी सदर प्रशिक्षण योजनेचा पहिल्यांदाच लाभ घेत आहे. तसेच यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे संस्थेमार्फत राबविण्यात आलेल्या MPSC-State Service, Group B and C, MES, JMFC/IBPS/ व पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षणाचा मी लाभ घेतलेला नाही किंवा यांपैकी कोणत्याही योजनेचा एकदाच लाभ घेतलेला आहे.

६. मी जर UPSC प्रशिक्षणाचा लाभ घेतला असेल तर सदर योजनेसाठी मी अपात्र असेल याबाबत लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यास माझा प्रवेश रद्द होईल याची मला जाणीव आहे. तसेच दरम्यानच्या काळात घेतलेले सर्व लाभ मी परत करेन.

७. काठिण्य पातळीनुसार चढत्या क्रमाने 4वर्ग)<वर्ग3<वर्ग 2<वर्ग 1) घेण्यात येणाऱ्या पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांने पुर्वी तुलनेने कमी काठिण्य पातळी पुर्व प्रशिक्षणाचा लाभ घेतला असला तरी संबंधित विद्यार्थ्यांस चढत्या क्रमाने प्रशिक्षण कार्यक्रमाचा पुनश्च केवळ एकदाच : लाभ घेता येईल. सदर निर्णयाबाबत मी अवगत असून मी दोन वेळा लाभ घेतला असल्यास माझा प्रवेश रद्द होईल याची मला जाणीव आहे याबाबत लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यास माझा प्रवेश रद्द होईल याची मला जाणीव आहे. तसेच दरम्यानच्या काळात घेतलेले सर्व लाभ मी परत करेन.

८. प्रशिक्षण योजनेच्या कालावधी दरम्यान मी कुठेही शासकीय / निमशासकीय नोकरी करणार नाही. तसे आढळल्यास किंवा याबाबत आपल्या कार्यालयास काही तक्रार प्राप्त झाल्यास माझा प्रवेश रद्द करण्यात येईल, याला माझी हरकत नसेल.

९. प्रशिक्षण योजनेच्या कोणत्याही टप्प्यावर प्रशिक्षण सोडवायचे असल्यास मी घेतले सर्व लाभ, दरम्यानच्या काळात प्रशिक्षण योजनेकरीता माझ्यावर झालेला सर्व खर्च डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे संस्थेला परत करेल, तसे न केल्यास कायदेशीर आणि दंडात्मक कारवाईस मी पात्र राहीन.

१०. माझी शासकीय/निमशासकीय सेवेत निवड झाल्यास मी प्रशिक्षण संस्थेला व डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था(बार्टी), पुणे संस्थेला तात्काळ कळवेन.

११. सदर स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजनेदरम्यान माझ्या आरोग्याची व सुरक्षिततेची जबाबदारी मी स्वतः घेईन.

१२. प्रशिक्षण योजनेच्या कालावधी दरम्यान माझ्याकडून कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन होणार नाही. मी प्रशिक्षण संस्थेतील सर्व नियमांचे व शिस्तीचे पालन करीन. इतर व्यक्तीला व संस्थेला त्रास होणार नाही याची मी काळजी घेईन. तसेच प्रशिक्षण कालावधीमध्ये धुम्रपान/अंमली पदार्थाचे सेवन, मद्यपान, उद्धट वर्तन असे कोणतेही गैर प्रकार केलास माझी निवड रद्द करण्यात येईल व कायदेशीर आणि दंडात्मक कारवाईस पात्र राहील याची मला जाणीव आहे.

१३. प्रशिक्षण कोणत्याही टप्प्यावर रद्द करणे, स्थगित करणे, प्रशिक्षणामध्ये बदल करणे याचे सर्व अधिकार माननीय महासंचालक बार्टी पुणे यांना आहेत याची मला कल्पना असून सदर अट मला मान्य आहे.

१४. प्रशिक्षण काळात प्रशिक्षणाबाबत आढावा, नियंत्रण इ. बाबी विषयी डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे संस्था, पुणे मधील अधिकारी/कर्मचारी यांना माहिती अवगत करण्याचे तसेच त्यांना सहकार्य करण्याची हमी देतो/देते.

१५. सदरच्या प्रशिक्षण योजनेकरीता निवड झाल्यानंतर मी प्रशिक्षणासाठी तात्काळ रुजू होईल. जर मी दिलेल्या तारखेपासून ०७ दिवसाच्या आत रुजू न झालो/झाले नाही अथवा डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था(बार्टी), पुणे संस्थेशी किवा प्रशिक्षण संस्थेशी उशिरा रुजू होण्याबाबत संपर्क केला नाही तर माझ्याऐवजी निवड यादीतील किंवा प्रतीक्षा यादीतील उमेदवाराची निवड केल्यास माझी हरकत नाही.

मी सत्य प्रतिशेवर लिहून देतो/देते की, उपरोक्त नमूद प्रशिक्षण योजनेच्या सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी आपल्या कार्यालयाकडून दिलेल्या सर्व सूचना मला मान्य आहेत.

प्रशिक्षणार्थ्यांची स्वाक्षरी : ----------------------------------------------

प्रशिक्षणार्थ्याचे संपूर्ण नाव : -------------------------------------------------------------------------

भ्रमणध्वनी क्रमांक : -------------------------------------------------------------------------

आधारकार्ड क्रमांक : -------------------------------------------------------------------------

कायमचा पत्ता: -------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------

साक्षीदाराचे नाव व सही :

1. ---------------------------------- 2. ---------------------------------

तपासणी अधिकारी

नाव : -----------------------------------------------

स्वाक्षरी : -----------------------------------------------

## परिशिष्ट- क

# Admission Form

**Dr. BABASAHEB AMBEDKAR RESEARCH AND TRAINING INSTITUTE (BARTI), PUNE**

Name of Scheme : ------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

| | |
|---|---|
| Name of Coaching Institute: | |
| Admission No. | |
| Verifying Officer Name & Designation: | |

---

**TO BE FILLED IN BY CANDIDATE**

| | | |
|---|---|---|
| **1** | Full Name of the Candidate: (In Block Letters starting with Surname) | |
| **2** | Address for Communication with pin code | |
| **3** | Permanent Address | |
| **4** | Aadhar Card Number. | |
| **5** | Date of Birth | |
| **6** | Age | |
| **7** | Candidate Mob. No. | |
| **8** | Parent's Mob. No | |
| **9** | Email ID | |
| **10** | Name of the Local Guardian with full Address & Mobile No. | |
| **11** | Whether Physically Disabled/Differently abled? | |
| | If yes, mention the type of Disability. | |
| **12** | Name of the Caste | |
| **13** | Caste validity Certificate Number | |
| **14** | Caste Validity issuing | |

| | | |
|---|---|---|
| | authority (Samiti Name): | |

15. **Educational Qualification :**

| Examination Passed | Name of School/Clg | Board/ University | Year Of Passing | Subjects of Study | Class/ Division/ Grade | Percentage of Marks |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| HSC | | | | | | |
| Graduation | | | | | | |
| Post Graduation | | | | | | |

**Note : Attested Copies of following must be attached with the application forms.**
**Candidate should tick mark against all document enclosed in Table below.**

| Sr. No. | Particulars | Students Remark | Verifying Officer Remark |
|---|---|---|---|
| **1** | Certificates of Educational Qualification (Degree/PG Certificate) | | |
| **2** | Caste Certificate | | |
| **3** | Caste Validity Certificate | | |
| **4** | Domicile Certificate of Maharashtra | | |
| **5** | Birth Certificate/SSC Certificate/ School Leaving Certificate for the purpose of verifying the date of birth | | |
| **6** | Aadhar Card | | |
| **7** | Photo Identity proof (Election Card/Pan Card/Driving License, Aadhar Card Etc.) | | |
| **8** | Valid Proof of residence (Ration Card/Electricity Bill/Voter ID/Tel. Bill) | | |
| **9** | Certificate related Disability from issued by competent Authority if applicable | | |
| **Note : Self-attested copies of the above documents must be attached with prescribed application form. Original documents should be produced for verification if required at the time of admission.** | | | |

- **Candidates are advised to read carefully the document of Undertaking and Signed it.**

I hereby declare that the information furnished above is "True and Correct' to the best of my knowledge and belief, in case of any kind of discrepancy found, I will be fully liable for disciplinary action, as per rules and regulations of Dr.Babasaheb Ambedkar Research and Training Institute (BARTI), Pune. I will study dedicatedly only for the and utilize the resources wisely made available for the same BARTII, Pune.

Date:

Signature of Candidate:

Full Name of the Candidate:

Place:

Verified and Found Correct

Signature of Verifying Officer with stamp: